# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १४८ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## 'सहयोगी व आरोग्यसेवा परिषद' स्थापनेच्या कार्यवाहीला गती

**मुंबई:** राज्यातील आरोग्यसेवा आणखीन सुधारण्यासाठी आणि नागरिकांना उत्तम पद्धतीची सेवा लाभण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यसेवेत राज्याची मोठी झेप घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर आता 'महाराष्ट्र राज्य सहयोगी व आरोग्यसेवा परिषद'ची स्थापना करण्यात येणार आहे. या परिषदेच्या स्थापनेला गती देण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्णयामुळे राज्यातील आरोग्यसेवा, व्यावसायिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि नियमन अधिक सक्षम सोबतच जागतिक दर्जाचे होणार आहे.

## जि. प. 'नाशिक ते नासा', निवडणार 105 'ज्ञानयात्री'

**नाशिक :** जिल्हा परिषद नाशिकच्या 'मिशन स्कॉलरशिप' अंतर्गत 'ज्ञानयात्री' हा अभिनव शैक्षणिक सहल उपक्रम राबविण्यात येणार आहे. इयत्ता सातवीच्या सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांची विशेष निवड परीक्षा घेऊन गुणवत्तेच्या आधारे १०५ विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली जाणार असल्याची माहिती राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी जिल्हा परिषदेत पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी 'ज्ञानयात्री' उपक्रमाची संकल्पना व निवड प्रक्रियेची माहिती दिली.

# पिशोरमध्ये वीजेचा कहर; तीन महिलांचा करुण अंत!

## वाघुळखेडा शिवारातील थरारक घटना; घाटीत तिघांवर उपचार सुरू, परिसरावर शोककळा

**पिशोर दि. १७ (बापूसाहेब हरणकाळ ) :** पावसापासून बचाव करण्यासाठी कवठाच्या झाडाखाली घेतलेला आसरा सहा जणांच्या जीवावर बेतला. वाघुळखेडा शिवारातील राशाची टेकडीजवळील गट क्रमांक ७१ मध्ये गुरुवारी (दि. १७) दुपारी वीज कोसळून तीन महिलांचा जागीच दुर्दैवी मृत्यू, तर अन्य तीन जण गंभीर जखमी झाले. अचानक आलेल्या पावसासोबत झालेल्या या वीज दुर्घटनेने पिशोर परिसर हादरून गेला असून, तीन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

गुरुवारी दुपारी सुमारे १.३० वाजता वाघुळखेडा शिवारातील गट क्रमांक ७१ मध्ये सहा जण शेतीचे काम करीत होते. अचानक आकाशात ढग दाटून आले आणि जोरदार पावसाला सुरुवात झाली. पावसापासून बचाव करण्यासाठी फरजाना सय्यद हमीद (३८), तस्लीमा बानो सय्यद मुख्तार (५०), अलविरा सय्यद हनीफ (१६), हफिस सय्यद खलील (२२), हमीदा सय्यद हनीफ (३२) आणि अनिसा सय्यद निसार (३५) यांनी जवळच्या कवठाच्या झाडाखाली आसरा घेतला.

जोरदार विजेच्या कडकडाटासह झाडावर वीज कोसळली आणि झाडाखाली आसरा घेतलेले सहाही जण गंभीररीत्या जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच जखमींना पिशोर ग्रामीण रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले. प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. धीरज पाटील यांनी तपासणी केल्यानंतर फरजाना सय्यद हमीद, तस्लीमा बानो सय्यद मुख्तार आणि अलविरा सय्यद हनीफ यांना मृत



घोषित केले. हफिस सय्यद खलील, हमीदा सय्यद हनीफ आणि अनिसा सय्यद निसार यांच्यावर प्राथमिक उपचार करून त्यांना गंभीर प्रकृतीमुळे पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात हलविण्यात आले.

या दुर्घटनेतील १६ वर्षीय अलविरा सय्यद हनीफ हिच्या मृत्यूने परिसरातील नागरिकांमध्ये विशेष हळहळ व्यक्त होत आहे. एकाच दुर्घटनेत तीन महिलांचा मृत्यू झाल्याने पिशोर परिसरावर शोककळा पसरली आहे. मृत तिन्ही महिलांचे शवविच्छेदन पिशोर ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले. त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. रात्री सुमारे दहा वाजता जाधव गल्ली येथील कब्रस्तानात तिन्ही महिलांवर शोकाकुल वातावरणात दफनविधी करण्यात आला. नातेवाईकांचा आक्रोश आणि नागरिकांचा शोक यामुळे वातावरण अत्यंत भावनिक झाले होते.

घटनेची माहिती मिळताच पिशोर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार दत्तू लोखंडे, दत्तात्रय मोरे, विजय भोटकर आणि कौतिक सपकाळ यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दुर्घटनेनंतर कन्नडच्या आमदार संजना ताई जाधव, तहसीलदार सारिका भगत, तलाठी केवलचंद बहुरे तसेच हरुण शेख यांनी पिशोर ग्रामीण रुग्णालयात नातेवाईकांची भेट घेऊन सांत्वन केले. शासनाच्या नियमानुसार आवश्यक शासकीय मदत लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

यंदा पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना गुरुवारी जोरदार पावसाने दिलासा मिळाला; मात्र याच पावसासोबत आलेल्या वीजेच्या तडाख्याने तीन कुटुंबांचा आधार हिरावला. पिशोर परिसरातील या हृदयद्रावक घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे

## थोडक्यात वार्ता

### दहिगाव येथे झोपडीवर पडली वीज; दोघांचा मृत्यू

हिंदू प्रकाशवार्ता : सय्यद जमीरोद्दीन

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील दहीगाव येथे गुरुवारी दुपारी सुमारे साडेबारा वाजता वीज पडण्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, दहीगाव येथील रहिवासी मनोहर भिवसन दुधे (५५), त्यांची पत्नी पर्वताबाई मनोहर दुधे (५०) आणि मुलगा पंढरी मनोहर दुधे (३०) हे मूग काढण्यासाठी गट क्रमांक ४२ मधील शेतात गेले होते. कुटुंब शेतात काम करत असतानाच अचानक हवामान बदलले आणि पावसाला सुरुवात झाली. पावसापासून वाचण्यासाठी तिघेही शेतात बांधलेल्या झोपडीचा आसरा घेण्यासाठी गेले. याच दरम्यान अचानक झोपडीवर वीज कोसळली. वीज पडल्याने मनोहर भिवसन दुधे आणि पर्वताबाई मनोहर दुधे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा पंढरी दुधे हा जखमी झाला. सांगितले जात आहे की, वीज पडल्यानंतर पंढरी काही वेळासाठी म्हातारपणामुळे/धक्क्याने बेशुद्ध पडला होता. नंतर शुद्धीवर आल्यावर त्याने ग्रामस्थांना या घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत पोलिसांना सुचित केले. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून आवश्यक कारवाई करत पंचनामा केला. या घटनेचा पुढील तपास सिल्लोड ग्रामीण पोलिसांकडून केला जात आहे.

### राज्यावर 'पाणीटंचाई'चे सावट, टंचाईग्रस्त गावांचा आराखडा तयार करण्याचे निर्देश

**मुंबई:** राज्यातील अनेक भागांत सप्टेंबरचा निम्म्याहून अधिक कालावधी उलटूनही समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीसाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी गाव आणि वाड्यांची यादी तयार करून उपाययोजनांचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत पिके आणि पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला होता. पावसाने ओढ दिल्याने टंचाई निवारणाच्या उपाययोजना सुरू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. त्यानंतर पाणीपुरवठा विभागाने टंचाई कृती आराखडा तयार करण्यासंदर्भात शासन परिपत्रक जारी केले. त्यानुसार आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता असलेल्या गावांची आणि वाड्यांची यादी तयार करण्याची जबाबदारी तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

### संजय लाठकर अणुऊर्जा विभागाच्या महासंचालकपदी

**मुंबई :** मराठवाड्यातील संजय आनंदराव लाठकर यांच्यावर देशाच्या अणुऊर्जा क्षेत्राशी संबंधित सुरक्षेची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लातूरचे माजी पोलीस अधीक्षक आणि नांदेडचे रहिवासी असलेल्या लाठकर यांची केंद्र



सरकारच्या अखत्यारीतील अणुऊर्जा विभागाच्या महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. देशातील अणुऊर्जा केंद्रे, संबंधित संस्था तसेच किरणोत्सारी पदार्थांच्या साठ्यांच्या सुरक्षेचे व्यवस्थापन त्यांच्या अखत्यारीत राहणार आहे. लाठकर यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील ५०हून अधिक अणुऊर्जा केंद्रे आणि संबंधित संस्थांच्या सुरक्षेशी निगडित व्यवस्था तसेच युरेनियमसारख्या किरणोत्सारी पदार्थांच्या साठ्यांच्या सुरक्षेशी संबंधित जबाबदाऱ्या पार पाडल्या जाणार आहेत.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

## मराठवाड्यातील दुष्काळमुक्तीसाठी कृष्णाखोरे, कोकणातील पाणी आणणार-मुख्यमंत्री

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्याचा आधी स्वातंत्र्यासाठी संघर्ष झाला आता दुष्काळाशी संघर्ष सुरु आहे. आताही पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत आहे. या परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. ही परिस्थिती बदलवण्यासाठी कोकणातील आणि कृष्णाखोऱ्यातील वाहून जाणारे पाणी आपण मराठवाड्यात आणून मराठवाडा दुष्काळमुक्त करु,असा शब्द आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिला. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आज मुख्यमंत्री फडणवीस छत्रपती संभाजीनगर येथे आयोजीत मुख्य शासकीय सोहळ्यास उपस्थित होते. श्री. फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण, मानवंदना, शहीदस्मारकास अभिवादन करण्यात आले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आज मोठ्या उत्साहात साजरा झाला.

सिद्धार्थ उद्यान येथे आयोजीत या सोहळ्यास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, महापौर समीर राजूरकर, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे, खा.संदिपान भुमरे, खा. डॉ. कल्याण काळे, विधानपरिषद सदस्य आ.सतिष चव्हाण, आ. अंबादास दानवे, आ. सुहास शिरसाट, विधानसभा सदस्य आ. रमेश बोरनारे, आ. प्रदीप जयस्वाल, आ. प्रशांत बंब, आ. विलास भुमरे, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे, विभागीय आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार,



पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, माजी खासदार चंद्रकांत खैरे, इम्तियाज जलील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, मुक्तिसंग्राम सैनिक, त्यांचे कुटूंबिय, शासकीय अधिकारी- कर्मचारी, पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी शहीद स्मारकास मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनीही पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. त्यानंतर बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. तसेच राष्ट्रध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या भाषणाच्या प्रारंभी त्यांण छत्रपती शिवराय, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना अर्पित केली.

ते म्हणाले की, अनेकांच्या बलिदानामुळेच खऱ्या अर्थानं मराठवाडा मुक्त झाला आहे. त्यावेळी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, ह्यांनी एक प्रचंड मोठी लढाई उभारली त्यातून आपला मराठवाडा मुक्त झाला. त्यावेळी अत्याचाराची परिसिमा झाली होती.अशा प्रकारच्या अवस्थेतून या मराठवाड्याला बाहेर काढण्याचं काम हे आपल्या स्वातंत्र्य संग्राम सेनानींनी केलं त्यांच्याप्रती आपली कृतज्ञता श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.

**शेतकऱ्यांना सर्वप्रकारची मदत :** श्री. फडणवीस म्हणाले की, मराठवाडा सातत्याने संघर्ष करतोय. विकासाचा संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. दुष्काळाचं संकट हे सातत्याने घोंगावताना दिसतं. यंदाचे वर्ष देखील दुष्काळाचं वर्ष आहे. पावसाचा मोठा खंड पडला आणि मोठ्या प्रमाणात शेतीचं, पिकांचं नुकसान झालं. आमचा शेतकरी चिंतेत आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहील, शेतकऱ्यांना सगळ्या प्रकारची मदत आपण देऊ. पंचनाम्यांची प्रक्रिया ५ ऑक्टोबर नंतर पूर्ण करुन आम्ही शेतकऱ्यांना मदत करु. पिण्याचे पाणी, चारा अशी सगळी व्यवस्था आणि नियोजन केलं आहे.

*कर्जमुक्तीचा लाभ, जुनी वीजबिलं रद्द*

श्री, फडणवीस यांनी पुढे सांगितले की, आपल्या सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सुरू केली. या योजनेचा सर्वाधिक लाभ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलाय.आतापर्यंत १५ लाखांच्या वर शेतकरी कर्जमुक्त झाले आहेत. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहेच शिवाय आता जवळपास ४८ हजार कोटी रुपयांची, जुनी वीज बिल रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे,असेही त्यांनी सांगितले.

*पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू न देण्याचा संकल्प*

मराठवाड्याच्या दुष्काळीस्थितीबाबत ते म्हणाले की, मराठवाड्याच्या या पिढीने दुष्काळ पाहिला; पण पुढच्या पिढीला आपल्याला दुष्काळ पाहू द्यायचा नाही हा संकल्प आम्ही केला आहे. आणि त्या दृष्टीने अतिशय वेगाने वाटचाल सुरु आहे. कृष्णा खोऱ्यातलं पाणी भीमा खोऱ्यातून अतिरिक्त ३० टीएमसी पाणी मराठवाड्यामध्ये आणायचं काम आता सुरू करत आहोत. यामुळे धाराशिव, बीड आणि लातूरच्या भागापर्यंत पाणी आणता येईल.तसेच गोदावरीच्या खोऱ्यामध्ये उल्हास खोऱ्यातून, कोकणातून पाणी उचलून आणि नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून आणण्याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यामध्ये पोहोचले आहे. अंदाज असा आहे की, जवळपास ७० टीएमसी पाणी उल्हास खोऱ्यातून हे गोदावरीच्या खोऱ्यात आपल्याला आणता येईल आणि आपला मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होईल. टप्प्याटप्प्यानं; सात वर्षात हे काम पुर्ण होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शहरातील पाणीपुरवठा योजनेबाबत श्री. फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरच्या पाणीपुरवठा योजनेचं काम हे आता अंतिम टप्प्यामध्ये पोहोचलेलं आहे. निधीची कमतरता पडू दिली नाही. वेगाने काम चाललेलं आहे. अडचणी आपण दूर करतो आहोत. लवकरच छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रत्येक घरी रोज पिण्याचं पाणी येईल. त्याकडे आपली वाटचाल ही सुरू झाली आहे,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या हस्ते श्री गणेश महासंघाच्या गणरायाचे पूजन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी निराला बाजार येथील जिल्हा श्री गणेश महासंघ उत्सव समितीच्या कार्यालयास भेट देत श्री गणेश महासंघाच्या गणरायाचे पूजन केले. यावेळी गणरायाच्या चरणी सर्वांना आरोग्य, सुख-समृद्धी आणि आनंद लाभावा, अशी प्रार्थना ठाकरे यांनी केली. त्यांच्यासोबत खासदार अनिल देसाई उपस्थित होते.

श्री गणेश महासंघ उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे पाटील यांनी उद्धव ठाकरे यांचे स्वागत केले. कार्याध्यक्ष दिनेश राजेभोसले यांनी खासदार अनिल देसाई यांचे स्वागत केले. यावेळी कार्याध्यक्ष अनिकेत निल्लावार, विशाल दाभाडे, संदीप शेळके, हरीश शिंदे, लक्ष्मीनारायण बाखरीया, प्रवीण शिंदे, प्रितेश जैस्वाल, सुनील धात्रक, सुधीर घाडगे, नितीन झरे यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानच्या गणरायाची आरती



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विनोद भैय्या पाटील यांच्या अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानच्या वतीने विराजमान करण्यात आलेल्या गणरायाची आरती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी गणरायाचे दर्शन घेत आरती केली. यावेळी उपस्थित गणेशभक्तांनी जयघोष करत परिसर भक्तिमय केला.

या प्रसंगी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, आमदार नारायण कुचे, भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिजीत देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित गणेशोत्सव सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीमुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आरतीनंतर महाराष्ट्राच्या सुख, समृद्धी, शांतता आणि प्रगतीसाठी गणरायाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

## "शाल जोडे"




# 'दहा लाख दे, नाहीतर जीव घेऊ'; धमक्यांनंतर बाभुळगावात तरुणाची आत्महत्या !

## आरोपीतांना अभय , मोबाईल रिसेट केल्याचा पोलिसांवर गंभीर आरोप

सिल्लोड ( प्रतिनिधी )

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस हद्दीतील वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीतील बाभूळगाव परिसरात एका तरुणाच्या आत्महत्येप्रकरणी गंभीर आरोप करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. सततच्या धमक्या, मानसिक छळ, खंडणीची मागणी आणि जीवे मारण्याच्या धमक्यांमुळेच आपल्या भावाने आत्महत्या केल्याचा दावा मृताच्या भावाने पोलीस अधीक्षकांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे. विशेष म्हणजे, आत्महत्येनंतर पोलिसांनी ताब्यात घेतलेला मृत तरुणाचा मोबाईल 'रिसेट/फॉरमॅट' करून त्यातील संभाव्य डिजिटल पुरावे नष्ट केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

अर्जदार विष्णू शिवाजी फरकाडे यांनी २५ मे रोजी पोलीस अधीक्षक, ग्रामीण छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा भाऊ नवनाथ शिवाजी फरकाडे याचे एका विवाहित महिलेसोबत परस्पर संमतीने प्रेमसंबंध होते. ही बाब उघडकीस आल्यानंतर गावातील पंच व प्रतिष्ठित व्यक्तींच्या मध्यस्थीने प्रकरण मिटविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

मात्र, त्यानंतर संबंधित महिलेच्या कुटुंबीयांकडून नवनाथला कथितरीत्या वारंवार त्रास देण्यात येत होता, असा आरोप करण्यात आला आहे. 'तुला जिवंत सोडणार नाही', 'कायमचा बंदोबस्त करू', 'दहा लाख रुपये दे, नाहीतर जीव घेऊ', तसेच बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.



तक्रारीनुसार, १७ मे रोजी रात्री सुमारे ११ वाजता काही व्यक्ती घरात आल्या आणि शिवीगाळ करून कुटुंबाला धमकावल्याचा आरोप आहे. या सततच्या धमक्या व मानसिक दबावामुळे नवनाथ मानसिकदृष्ट्या खचला आणि दुसऱ्या दिवशी, १८ मे रोजी सकाळी सुमारे ७ वाजता त्याने आत्महत्या केल्याचा दावा करण्यात आला आहे.

**मोबाईल रिसेट झाल्याचा आरोप; तपासावरच प्रश्नचिन्ह**

या प्रकरणाला आणखी गंभीर वळण देणारी दुसरी तक्रार विष्णू फरकाडे यांनी १६ जून रोजी पोलीस अधीक्षकांकडे दिली आहे. आत्महत्येच्या पंचनाम्यावेळी पोलिसांनी नवनाथचा मोबाईल आणि काही कागदपत्रे ताब्यात घेतल्याचे त्यात म्हटले आहे. मोबाईलमध्ये कॉल रेकॉर्डिंग, संदेश आणि इतर डिजिटल पुरावे असण्याची शक्यता तक्रारदाराने व्यक्त केली आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात धाव घेतल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या समक्ष मोबाईल उघडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतर पोलिसांनी मोबाईल 'रिसेट/फॉरमॅट' केल्याने महत्त्वाचे डिजिटल पुरावे नष्ट झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बीट जमादार खाकरे व गायकवाड या पोलीस कर्मचाऱ्यांनी तपासात आरोपींना साथ देऊन प्रकरण कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, आत्महत्येस प्रवृत्त करणे, खंडणीची मागणी, जीवे मारण्याची धमकी आणि इतर आरोपांची सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे. या आरोपांबाबत पोलिसांची भूमिका विचारली असता संबधित प्रकरणी जाब जबाब घेऊन प्रकरण वरिष्ठांकडे मार्गदर्शनासाठी ठेवण्यात आले

# संपादकीय

## अभिषेक शर्माची ऐतिहासिक खेळी: शतकाचा नवा विक्रम

भारतीय क्रिकेट संघाने नेहमीच जागतिक पातळीवर अनेक अद्वितीय आणि गौरवशाली विक्रम प्रस्थापित केले आहेत, परंतु काही खेळाडू आपल्या वैयक्तिक आणि अफाट कामगिरीने संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतात. भारतीय क्रिकेट संघाचा अत्यंत आक्रमक सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्मा याने अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अशीच एक दैदिप्यमान आणि ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अवघ्या तीस चेंडूंमध्ये धडाकेबाज शतक पूर्ण करत त्याने भारतीय टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वात वेगवान शतकाचा नवा विश्वविक्रम आपल्या नावावर नोंदवला आहे. त्याच्या या वादळी खेळीमुळे केवळ क्रीडावर्तुळातच नव्हे, तर देशभरातील कोट्यवधी क्रिकेटप्रेमींमध्ये आनंदाचे व उत्साहाचे अभूतपूर्व वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या सामन्यात अभिषेक शर्माने सुरुवातीपासूनच अफगाणिस्तानच्या गोलंदाजांवर चौकार आणि षटकारांची अक्षम्य आतषबाजी करत अक्षरशः तांडव घातले. ३४ चेंडूंचा सामना करताना त्याने १०८ धावांची अत्यंत विस्मरणीय खेळी केली, ज्यामध्ये ९ चौकार आणि तब्बल १० गगनचुंबी षटकारांचा समावेश होता. विशेषतः पॉवरप्लेच्या पहिल्या सहा षटकांतच ७६ धावांची विस्फोटक खेळी करत त्याने संघाला अभूतपूर्व आणि भक्कम सुरुवात करून दिली. यापूर्वी भारतीय पुरुष टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान शतकाचा विक्रम स्टार फलंदाज रोहित शर्माच्या नावावर होता, ज्याने ३५ चेंडूंमध्ये शतक पूर्ण केले होते. अभिषेकने हा जुना विक्रम मोडीत काढत अवघ्या ३० चेंडूंमध्ये शतकाचा टप्पा गाठला आणि जागतिक स्तरावरही भारतीय क्रिकेटचा दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला. त्याची ही जिद्द, प्रचंड आत्मविश्वास आणि उच्च दर्जाची फलंदाजी आगामी काळातील महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी भारतीय संघासाठी अत्यंत मोलाची आणि फायदेशीर ठरणार आहे. क्रिकेटच्या पटलावर जेव्हा अशा प्रकारच्या खेळी पाहायला मिळतात, तेव्हा युवा खेळाडूंना मिळणारे प्रोत्साहन आणि आत्मविश्वास द्विगुणित होतो. आधुनिक टी-२० क्रिकेटचे स्वरूप वेगाने बदलत असून प्रत्येक चेंडूवर धावांची गती कायम राखणे आवश्यक असते. अशा आव्हानात्मक वातावरणात अभिषेकने दाखवलेले तंत्रशुद्ध आक्रमक धोरण कौतुकास्पद आहे. गोलंदाजांवर कोणतीही दया न दाखवता त्यांनी केलेल्या या उत्कृष्ट फलंदाजीमुळे भारतीय संघाची फलंदाजी बेंच स्ट्रेन्थ किती मजबूत आहे, हे जगासमोर पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे भविष्य उज्वल आहे, याचे हे उत्तम उदाहरण असून, क्रिकेटरसिकांच्या मनात या शतकाने नेहमीसाठी आपले विशेष स्थान निर्माण केले आहे.



गुलमंडी येथील सौ.नम्रता अंकुश तांबे यांच्या घरच्या गौरी.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त बाणगंगा येथे महाआरती संपन्न

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त मुंबईतील मलबार हिल येथील ऐतिहासिक आणि पवित्र बाणगंगा परिसरात एका दिमाखदार आणि भक्तिभावपूर्ण महाआरतीचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविक आणि नागरिक सहभागी झाले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या विशेष कार्यक्रमात उपस्थित सर्व मान्यवर आणि भाविकांनी देशसेवेसाठी त्यांना उत्तम आरोग्य, सुयश आणि दीर्घायुष्य लाभावे, यासाठी प्रार्थना केली. यावेळी बाणगंगा परिसर पूर्णपणे देशभक्ती आणि भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला होता.

या प्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले, "आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त बाणगंगा येथे महाआरती करून त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, यासाठी प्रार्थना केली. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत देश विकासाच्या विविध क्षेत्रांत झपाट्याने पुढे जात आहे. देशाच्या विकासाचा संकल्प आणि जनसेवेची भावना अधिक दृढ व्हावी, यासाठी आजच्या या पवित्र स्थळी प्रार्थना केली आहे."

ते पुढे म्हणाले की, आपल्या भारतीय संस्कृतीत धार्मिक श्रद्धा आणि राष्ट्रसेवा यांना सदैव विशेष महत्त्व देण्यात आले आहे. अशा मंगलमय प्रसंगी देशाच्या प्रगतीसाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक भावना असल्याचे त्यांनी नमूद केले. महाआरतीदरम्यान बाणगंगा परिसरात एक वेगळाच आध्यात्मिक आणि उत्साही माहोल पाहायला मिळाला. उपस्थित नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी आणि स्थानिकांनी पंतप्रधान मोदींना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच देशात शांतता, समृद्धी आणि अखंड प्रगती कायम राहावी, यासाठी सदिच्छा व्यक्त करण्यात आल्या. या महत्त्वपूर्ण सोहळ्यास स्थानिक नगरसेवक, विविध क्षेत्रांतील मान्यवर तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## सर्व्हिस नेटवर्क 1,000 टचपॉइंट्सपर्यंत विस्तारण्याची योजना

मुंबई : एआय प्लस स्मार्टफोनने भारतातील विक्रीनंतरची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सर्व्हिस नेटवर्क 1,000 हून अधिक टचपॉइंट्सपर्यंत विस्तारण्याची घोषणा केली आहे. सध्या 800 हून अधिक सर्व्हिस सेंटर्स असलेल्या नेटवर्कमध्ये 200 हून अधिक केंद्रांची भर पडणार आहे. याशिवाय, दिवाळीत दिल्लीत पहिले एक्सक्लुझिव्ह एआय प्लस सर्व्हिस सेंटर सुरू करण्यात येणार आहे. ग्राहकांना तांत्रिक सहाय्य, अस्सल स्पेअर पार्ट्स, दुरुस्ती, वॉरंटी आणि सॉफ्टवेअर सपोर्ट मिळेल.

## "सेवा संकल्प अभियाना"चा पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते शुभारंभ

## परभणी जिल्ह्यात "सेवा संकल्प अभियान" प्रभावीपणे राबवा- पालकमंत्री

हिंदु प्रकाश वार्ता /परभणी

**परभणी,** : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला 25 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने परभणी जिल्ह्यात आजपासून ते 17 ऑक्टोबरपर्यंत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार आहे. शासनाच्या विविध योजना व सेवांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवून समाजातील शेवटच्या घटकाला विकासाच्या प्रवाहात आणणे, हा अभियानाचा मुख्य उद्देश आहे. प्रशासनाने हे अभियान परभणी जिल्हयात प्रभावीपणे राबवावे. तर नागरिकांनी या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन शासकीय योजनांचा व सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज दीपप्रज्वलन करून पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते 'सेवा संकल्प अभियानाचा' शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना व सेवा पोहोचविण्यावर भर दिला आहे. विविध लोककल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर 'सेवा संकल्प अभियानाच्या' माध्यमातून जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या लोकाभिमुख योजना पोहोचवून अभियान यशस्वी करावे.

*परभणीचा ऐतिहासिक वारसा जगभर पोहोचवा*



जिल्हा प्रशासनाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'परभणी जिल्हा ऐतिहासिक वारसा- वारसा शिल्पसंपदेचा, मागवा पर्यटनाचा' या कॉफी टेबल बुकच्या मराठी व इंग्रजी आवृत्तीचे पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. जिल्ह्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाची माहिती देणाऱ्या या पुस्तकाचे त्यांनी कौतुक केले. पुस्तकाच्या निर्मितीसाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.

परभणी जिल्ह्याची ऐतिहासिक व पर्यटन ओळख देशभर तसेच जगभर पोहोचविण्यासाठी या कॉफी टेबल बुकचा व्यापक वापर करावा. देशातील विविध विमानतळांवर हे पुस्तक उपलब्ध करून देण्याबाबतही प्रयत्न करावेत, अशी सूचना त्यांनी केली. उत्कृष्ट पद्धतीने कॉफीटेबलची निर्मिती केल्याबद्दल पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी 'सेवा संकल्प अभियानातंर्गत' राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची व योजनांची सविस्तर माहिती दिली. तसेच कॉफी टेबल बुकच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

यावेळी कॉफी टेबलच्या निर्मितीसाठी सहकार्य करणारे डॉ. आत्माराम शिंदे यांचे प्रतिनिधी डॉ. डोल्हारे, मल्हारीकांत देशमुख, अनिल स्वामी, डॉ. सीमा नानवटे, प्रा. अनिल बडगुजर, नागेश जोशी, डॉ. निळकंठ काळदाते, वैजनाथ काळदाते, प्रल्हाद पवार, सिद्धार्थ कांबळे, सुधीर देऊळगावकर, संजय ठाकरे, उज्वल पंडित, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक रोहित

जैस्वाल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी तथा मुख्य समन्वयक (परभणी जिल्हा ऐतिहासिक वारसा समिती) पवन खांडके यांचा यावेळी पालकमंत्री यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी पालकमंत्री बोर्डीकर यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना लाभ प्रमाणपत्रे व मंजुरीचे आदेश वितरित करण्यात आले.

*जिल्हाधिकारी कार्यालयात लिफ्टचे उदघाटन*

जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या दिव्यांग तसेच जेष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या लिफ्टचे उदघाटन पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते झाले. दिव्यांग व जेष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी प्रशासनाने उभारलेल्या या सुविधेचे यावेळी कौतुक करण्यात आले.

## दुष्काळसदृश परिस्थितीचा पालकमंत्र्यांकडून आढावा; दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना अडचण भासू देऊ नका

### पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचे प्रशासनाला निर्देश; आवश्यक मदतीसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** : जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज खरीप पिकांची स्थिती, पीकविमा, प्रकल्पातील पाणीसाठा, चारा उपलब्धता तसेच जल जीवन मिशनअंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेतला. टंचाईच्या काळात शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत अडचणी भासू देऊ नयेत, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. पीकविम्याच्या अनुषंगानेही आवश्यक कार्यवाही वेळेत करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळण्यासाठी शासन स्तरावर निश्चितपणे पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीस जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता वाकळे, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, अप्पर जिल्हाधिकारी शोभा जाधव निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर, तालुका कृषी अधिकारी आदी उपस्थित होते तर उपविभागीय अधिकारी तहसीलदार हे व्हीसीद्वारे सहभागी झाले होते.

पालकमंत्री म्हणाल्या की, संभाव्य टंचाई लक्षात घेऊन ग्रामपंचायतींनी स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन टंचाई कृती आराखडा तयार करावा. पाणी व चारा उपलब्धतेचे योग्य नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासन व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिल्या.



जल जीवन मिशनअंतर्गत बंद अथवा दुरुस्ती आवश्यक असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत. योजनांची प्रत्यक्ष तपासणी करून आठ दिवसांत अहवाल सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले. पाटबंधारे विभागाने मागणीप्रमाणे जायकवाडी, येलदरी प्रकल्पातून पाणी उपलब्ध करून द्यावे.

दुष्काळसदृश परिस्थितीत प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात आणि शेतकरी व नागरिकांना पाणी, चारा किंवा अन्य कोणत्याही बाबतीत अडचण येणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी स्पष्ट केले.

पीक वाया गेल्यास मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग घेण्याचे आवाहन

सर्वसाधारणपणे नियोजित पीक कापणी प्रयोगाचे उत्पादन हे पीक कापणीस तयार झाल्यानंतर नोंदविले जाते. मात्र, अपवादात्मक परिस्थितीमध्ये (उदा. अतिवृष्टी, पूर ,अवर्षण, रोग -किडींचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव यामुळे पीक वाया गेल्यास किंवा नष्ट झाल्यास) शेतकरी सदर पीक मोडून दुसऱ्या पिकासाठी जमीन तयार करणार असतील तर सदर पीक कापणी प्रयोगासाठी जे शेत निवडले असेल त्या शेतामध्ये मुदतपूर्व पीक कापणी प्रयोग घेणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत पीक कापणी प्रयोगाचे आयोजन करून वास्तविक उत्पादन नोंदविणे आवश्यक आहे . जर उत्पादन शून्य येत असेल तर ग्रामस्तरीय समिती सदस्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून पीक कापणी प्रयोग घेण्यात यावा. ज्या शेतकऱ्यांच्या शेतावर हे प्रयोग घेण्यात येणार आहेत त्यांनी पीक काढणी अगोदर संबंधित सहाय्यक कृषी अधिकारी / तलाठी /ग्रामसेवक यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त वनामकृवित 'रब्बी पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन' संपन्न

### 'शेतकरी देवो भव' भावनेतून वनामकृविचे विस्तार कार्य; परिसंवाद व कृषि प्रदर्शनास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी** :-मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रब्बी पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन' गुरुवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठातील कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्याचे वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय तथा कामगार राज्यमंत्री मा. ना. ॲड. श्री. आशिष जयस्वाल यांनी आभासी माध्यमातून केले. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि होते.

कार्यक्रमास भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या नागपूर येथील राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व जमीन वापर नियोजन ब्युरोचे संचालक डॉ. एन. जी. पाटील, पद्मश्री माननीय श्री. श्रीरंग देवबा लाड, प्रगतिशील महिला शेतकरी श्रीमती मीरा चोपडे तसेच विद्यापीठाच्या विस्तार समितीचे सदस्य श्री. भिमराव डोणगापुरे यांची विशेष उपस्थिती होती.

व्यासपीठावर विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश आहिरे, संचालक शिक्षण डॉ. बाबासाहेब ठोंबरे, संचालक संशोधन डॉ. भगवान आसेवार, कुलसचिव श्री. पुरभा काळे, विद्यापीठ अभियंता श्री. दीपक कशाळकर, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. भास्कर कोळेकर आणि मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे माननीय कृषि मंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. मराठवाड्यात मागील काही काळात पावसाने ओढ दिल्यामुळे काही भागांत पिकांचे नुकसान होत असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. या परिस्थितीत शासन आणि विद्यापीठ शेतकऱ्यांच्या पाठीशी सदैव उभे असल्याची ग्वाही त्यांनी दिली. शेतीसमोरील विविध आव्हाने सोडविण्यासाठी शासन तत्पर असून, खरीप हंगामातील अडचणींचा विचार करून आगामी रब्बी हंगामाचे योग्य नियोजन करण्याचे आवाहन त्यांनी केले. शेवटी त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

राज्यमंत्री मा. ना. ॲड. श्री. आशिष जयस्वाल यांनी आभासी माध्यमातून मार्गदर्शन करताना कृषि क्षेत्रासाठी राज्य शासनाकडून करण्यात येणारी गुंतवणूक आणि राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना होत असल्याचे नमूद केले. तसेच त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

पालकमंत्री मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, हे वर्ष महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे केले जात असून, महिलांना महिला शेतकरी म्हणून स्वतंत्र ओळख मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी केले आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या विविध कार्यक्रमांमध्ये महिलांचा सातत्याने मोठा सहभाग असतो. विद्यापीठ शेतकऱ्यांसाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमांमुळे हा सहभाग वाढत आहे, असे प्रतिपादन केले.

पुढे त्यांनी नमूद केले की, विद्यापीठाकडून शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम सातत्याने माझ्यापर्यंत पोहोचत असतात. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी, माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस तसेच विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील आहेत.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या मागील चार वर्षांच्या कार्यकाळात विद्यापीठाच्या कार्याला सातत्याने गती मिळाली असून, विद्यापीठ प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. सुरुवातीच्या काळात माझ्याकडे मंत्री पदाचा पदभार नसताना शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी एका शास्त्रज्ञाने पाच शेतकरी दत्तक घेऊन त्यांच्या विकासासाठी कार्य करावे, अशी सूचना मी केली होती. त्यानुसार विद्यापीठाने कार्यवाही करून जवळपास ५०० शेतकऱ्यांना दत्तक घेतले असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत.

परभणी जिल्ह्यात 'सिल्क आणि मिल्क' यांसारखे उपक्रम कार्यान्वित करण्यात आले असून, त्यातून काही शेतकरी वर्षाला दहा ते पंधरा लाख रुपयांपर्यंत उत्पन्न मिळवीत आहेत. शेतीसोबत विविध जोडधंदे करून शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व टिकून राहण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. हे सर्व माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली तसेच विद्यापीठाच्या प्रयत्नांतून घडत असल्याचा अभिमान वाटतो, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी तग धरणाऱ्या वाणांचे आणि बियाण्यांचे निर्मितीकार्य हाती घेतल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. शासनाने शेतकऱ्यांसाठी दोन वेळा कर्जमाफी केली असून, वीजबिलाच्या संदर्भातही शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सध्या शेतकऱ्यांना शून्य वीजबिलाचा लाभ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

शेतीमध्ये गरजेपेक्षा अधिक खते व रासायनिक घटकांचा वापर केल्यामुळे उत्पादन खर्च वाढतो आणि जमिनीची सुपीकता व प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. परिणामी शेतकऱ्यांवर आर्थिक बोजा वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी विद्यापीठातील शास्त्रज्ञ आणि कृषि विभागाच्या सल्ल्यानुसारच आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती करावी, असे आवाहन पालकमंत्री मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी महाराष्ट्र राज्याने कृषि क्षेत्रात देशाला दिशादर्शक ठरणारे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविल्याचे नमूद केले. 'महा-ई-पीक पाहणी' व 'महाविस्तार' ॲपसारख्या उपक्रमांचा त्यांनी उल्लेख केला. 'शेतकरी देवो भव' या भावनेतून विद्यापीठाने शेतकऱ्यांना सेवा देण्याचे कार्य केले असून, त्यातून विद्यापीठाला राज्यात प्रथम आणि राष्ट्रीय पातळीवर ३४ वे स्थान मिळाले असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीच्या नियोजनासाठी कृषि विभागाशी समन्वय साधून विद्यापीठ कार्य करीत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या सहकार्याने हवामानाचा अधिक अचूक अंदाज मिळण्यासाठी विद्यापीठात डॉप्लर रडारची स्थापना करण्याच्या दिशेने कार्य सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. या माध्यमातून परभणीचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक अधोरेखित होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठ त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगून, सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी धीर धरावा आणि उपलब्ध शास्त्रीय मार्गदर्शनाच्या आधारे रब्बी हंगामाचे नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

माननीय पद्मश्री श्री. श्रीरंग देवबा लाड यांनी विद्यापीठाकडून सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांमुळे शेतकऱ्यांमध्ये विद्यापीठाबद्दल विश्वास निर्माण झाल्याचे नमूद केले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनासारख्या सणाच्या दिवशीही महिला शेतकऱ्यांसह मोठ्या संख्येने शेतकरी कार्यक्रमास उपस्थित राहिले, ही विद्यापीठाच्या विस्तार कार्याची पोहोच दर्शविणारी बाब असल्याचे त्यांनी सांगितले. परभणी जिल्हा नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असून, या ठिकाणी कृषि विद्यापीठाची स्थापना होणे ही परभणी आणि मराठवाड्यासाठी गौरवाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या शास्त्रीय ज्ञानाचा शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले.

माननीय डॉ. एन. जी. पाटील यांनी भारत सरकारच्या डिजिटल कृषि उपक्रमाच्या अनुषंगाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ आणि राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण व जमीन वापर नियोजन ब्युरो यांच्यातील सामंजस्य करारातून विकसित करण्यात आलेल्या 'मराठवाडा जिओपोर्टल' ची माहिती दिली.

या पोर्टलच्या माध्यमातून जमिनीची क्षमता, भूजल उपलब्धता, मृदेची खतधारण क्षमता यांसह विविध भौगोलिक व मृदाविषयक माहिती उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. माती परीक्षणातून प्रामुख्याने अन्नद्रव्यांची माहिती मिळते; मात्र जिओ पोर्टलच्या माध्यमातून जमिनीची अधिक सखोल माहिती उपलब्ध होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी





सावळदबारा प्रतिनिधी गणेश चतुर्थीला गणरायाचे आगमन झाल्यानंतर गुरुवार 17 सप्टेंबर रोजी सोनपावलांनी गौराईचे आगमन झाले. सावळदबारा येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, आबाराव कोलते, नारायण कोलते, भावराव कोलते,जीवन कोलते या कोलते परिवार यांच्या घरातील महालक्ष्मी घरामध्ये सजावट करण्यात आली होती

## डॉ. संगीता आवचार यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर पुनर्नियुक्ती



**परभणी | प्रतिनिधी :**

येथील कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयातील प्रा. डॉ. संगीता आवचार यांची महाराष्ट्र शासनाच्या परभणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्यपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी नुकतेच त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढले.

डॉ. संगीता आवचार गेल्या दहा वर्षांपासून अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या माध्यमातून ग्राहकांचे प्रश्न, ग्राहक हक्क व जनजागृती यासाठी कार्यरत आहेत. सध्या त्या अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या देवगिरी प्रांत पर्यावरण प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या सामाजिक व ग्राहक चळवळीतील कार्याची दखल घेत जिल्हा प्रशासनाने त्यांची जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर पुनर्नियुक्ती केली आहे.

या नियुक्तीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे देवगिरी प्रांताध्यक्ष डॉ. विलास मोरे, प्रांतसचिव ओंकार जोशी यांच्यासह देवगिरी प्रांत व परभणी जिल्ह्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तसेच कुटुंबियांनी अभिनंदन केले.

## बोरी ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ अशोक बन यांनी घेतला पदभार



**बोरी प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील बोरी येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक रिक्त होते. बोरी येथे ग्रामीण रुग्णालयात डॉ अशोक बन ,डॉ खाडे सर यांनी पदभार स्वीकारला आहे.

पद स्वीकारतात बोरी येथील नामवंत डॉ कालिदास चौधरी यांनी (इंडियन मेडिकल असोशियन चे जिल्हाध्यक्ष )नव्याने ग्रामीण रुग्णालयात पदभार स्वीकारलेल्या डॉक्टरांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉक्टर गबाळे सर,डॉक्टर शेख सर, डॉक्टर देशमुख सर,शिपाई केंद्रे कुलकर्णी सर, बोरी येथील माजी सरपंच पंडित दादा घोलप ग्रामपंचायत सदस्य वामन शिंपले, भाजपा किसान मोर्चा दिनकर चौधरी. अशोक शिंपले, सुधाकर संगेकर, अनिल चैन, मुंजाभाऊ कंठाळे, आदी उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आदिती महाविद्यालयात वृक्षारोपण



***कुऱ्हाडी (जि. परभणी) :*** स्व. राधाबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अंतर्गत संचलित आदिती कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, कुऱ्हाडी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण व वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी महाविद्यालयात प्रा. मुरलीधर पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून महाविद्यालय परिसरात ४० नारळाच्या झाडांची लागवड करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण वाहुळे, प्राचार्य राहुल वाहुळे, प्रा. खुशाल घनसावत, प्राध्यापक प्रा. भारती वाहुळे,प्रा. अरुण आवचार, लिपिक सचिन इंजे, हर्षदीप लाटे, शेषराव इंजे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

## किया इंडियाने पॉवरट्रेन पर्यायांचा विस्तार केला

नवी दिल्ली: किया इंडिया या देशातील अग्रगण्य मास-प्रीमियम ऑटोमेकर कंपनीने आपल्या कॅरेन्स सीएनजी, कॅरेन्स क्लॅव्हिस सीएनजी आणि कार्निव्हल लिमोझिन हायब्रिड मॉडेल्ससाठी प्री-बुकिंग सुरू केल्याची घोषणा केली. यामुळे कंपनीच्या मल्टि-पॉवरट्रेन पोर्टफोलिओचा अधिक विस्तार झाला आहे, तसेच ग्राहकांना उत्पादन श्रेणीमध्ये अधिक पर्याय उपलब्ध झाले आहेत.

# मराठवाडा मुक्तीचा जयघोष! मनपा मुख्यालयात अभिमानाने फडकला तिरंगा; स्वातंत्र्यवीरांच्या त्यागाचे स्मरण

**हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालयात अत्यंत उत्साही आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. सकाळी ठीक ७.३० वाजता महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकवण्यात आला, ज्यानंतर उपस्थितांनी संविधानात्मक मूल्यांप्रती निष्ठा व्यक्त केली. या महत्त्वपूर्ण सोहळ्याने उपस्थितांच्या मनात स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक आठवणींना उजाळा दिला.



ध्वजारोहण सोहळ्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमात मार्गदर्शन करताना महापौर समीर राजूरकर यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांच्या बलिदानाचे स्मरण केले. यावेळी उपस्थितांना शुभेच्छा संदेश देताना त्यांनी स्पष्ट केले की, मराठवाड्याला निजामाच्या हुकूमशाहीतून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष आणि हुतात्म्यांनी दिलेले बलिदान कधीही विसरता कामा नये. स्वातंत्र्यासाठी त्यांनी सोसलेली पीडा आणि केलेला त्याग हा मराठवाड्याच्या इतिहासातील अत्यंत प्रेरणादायी अध्याय असून, हा गौरवशाली इतिहास आणि त्यांचे योगदान नवीन पिढीपर्यंत पोहोचविणे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

या दीपोत्सवी आणि प्रेरणादायी कार्यक्रमाला महानगरपालिका प्रशासनातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने गलिच्छ शहर सुधार समितीचे सभापती जालिंदर शेंडगे, गटनेते हाजी शेरखान, आरोग्य समितीच्या सभापती डॉ. सुनीता सोळुंके, नगरसेविका कीर्ती शिंदे, सुरेखा सानप, तसेच नगरसेवक सचिन खैरे, वाजेद जागीरदार, काकासाहेब काकडे आणि कुणाल खरात आदींसह महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे उपस्थित होते. यांच्यासह मनपाचे अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

विशेष म्हणजे, याच दिवशी प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती देखील असल्यामुळे महानगरपालिकेत त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेस अभिवादन करण्यात आल्यानंतर राष्ट्रपुरुषांच्या विचारांचे स्मरण करत या कार्यक्रमाची सांगता झाली.

# एमजीएममध्ये मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात

## स्त्रीशक्तीच्या योगदानाला सामाजिक कार्यकर्त्या उर्मिला चाकूरकर यांचा उजाळा

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर** : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील चिंतनगाह येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या उर्मिला चाकूरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांनी 'मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्त्रीशक्तीचा लढा' या विषयावर संवाद साधला.



उर्मिला चाकूरकर म्हणाल्या, मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या व्यापक जनआंदोलनात महिलांनी धाडसी आणि महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता अनेक अनाम महिला या लढ्यात सहभागी झाल्या. क्रांतिकारकांना सहकार्य करण्यापासून शस्त्रास्त्रे पोहोचविण्यापर्यंत विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. आशाताई वाघमारे, दगडाबाई शेळके, सुशीलाबाई दिवाण, ताराबाई परांजपे, कावेरीबाई बोधनकर यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्यांच्या योगदानाला अभिवादन केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ म्हणाले, महिलांसह सर्वसामान्य नागरिकांच्या सहभागामुळे हा लढा यशस्वी झाला. आज उद्योग, शिक्षण आणि संशोधनाच्या माध्यमातून मराठवाड्याची प्रगती होत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. आशुतोष पाटील यांनी मानले. यावेळी कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# राजकुंवर महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांची देशभक्तीपर भाषणे उपप्राचार्य डॉ. ए जे बेडवाळ यांच्याकडून मराठवाड्याच्या प्रगतीचा गौरवपूर्ण आढावा

**फर्दापूर प्रतिनिधी :** स्थानिक राजकुंवर महाविद्यालय धनवट फर्दापूर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अतिशय उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाला मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए जे बेडवाळ आणि मराठी विभागाचे प्रमुख प्रा गजानन शिवाजी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती

याप्रसंगी आयोजित मनोगत सत्रात विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा दैदिप्यमान इतिहास उलगडून दाखवला हैदराबाद संस्थानाचे भारतात झालेले ऐतिहासिक विलीनीकरण आणि या लढ्यात निर्माण झालेली राजकीय व सामाजिक पोकळी भरून काढण्यासाठी हुतात्म्यांनी दिलेल्या बलिदानावर विद्यार्थ्यांनी अत्यंत ओजस्वी विचार मांडले

मराठवाड्याने गाठले प्रगतीचे शिखर

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उपप्राचार्य डॉ. ए जे बेडवाळ यांनी मराठवाड्याच्या आजवरच्या वाटचालीचा गौरवपूर्ण आढावा घेतला ते म्हणाले की अनेक संकटे आणि आव्हानांवर मात करत आज मराठवाड्याने प्रगतीचे शिखर गाठले आहे. स्वामी रामानंद तीर्थ आणि इतर स्वातंत्र्यसैनिकांनी पाहिलेले स्वप्न आजच्या युवा पिढीने आपल्या शिक्षणातून आणि कर्तृत्वातून पुढे नेले पाहिजे हुतात्म्यांचे हे बलिदान आपण कधीही विसरता कामा नये

उत्स्फूर्त प्रतिसाद आणि आभार प्रदर्शन

या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला देशभक्तीपर घोषणांनी महाविद्यालयाचा परिसर दुमदुमून गेला होता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केले

या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सोहळ्याला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी

# अजिंठा पोलिसांचा रूट मार्च; सण-उत्सवासाठी कडेकोट तयारी

## शिवना, अजिंठ्यासह प्रमुख गावांत संचलन; कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची सज्जता

**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अजिंठा पोलीस ठाण्याच्या वतीने बुधवारी (दि. १६) शिवना शहरासह प्रमुख गावांत रूट मार्च काढण्यात आला. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासोबतच पोलिसांची सज्जता अधोरेखित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

सिल्लोडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजित काईगडे यांच्या मार्गदर्शनाखाली रूट मार्चचे आयोजन करण्यात आले. शिवना येथील मुख्य बसस्थानक व बाजारपेठ परिसरातून सुरुवात करून नुरानी चौक, जामा मशीद परिसर, शिवाई मंदिर, कुंभार गल्ली तसेच शहरातील प्रमुख मार्गावरून पोलिसांचे संचलन करण्यात आले.



अजिंठा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन इंगळे, पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब भट्टर, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी, कमांडो पथक आणि होमगाईस सहभागी झाले. पोलिसांच्या मोठया उपस्थितीमुळे प्रमुख मार्गावर नागरिकांचे लक्ष वेधले गेले.

शिवना, अजिंठा, गोळेगाव आणि अंभाई या प्रमुख गावांमध्येही रूट मार्च काढण्यात आला. संवेदनशील व गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची उपस्थिती वाढविण्यात येत असून गस्त, प्रतिबंधात्मक कारवाई आणि बंदोबस्ताच्या माध्यमातून कायदा-सुव्यवस्था राखण्यावर भर दिला जात आहे.

रूट मार्चचे प्रमुख ठळक मुद्दे

शिवना, अजिंठा, गोळेगाव, अंभाई या प्रमुख गावांत संचलन

नुरानी चौक, जामा मशीद, शिवाई मंदिर, कुंभार गल्लीसह प्रमुख मार्गावरून पोलिसांचा मार्च

कमांडो पथक आणि होमगाईसची सहभागीता

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सपोनि दिनकर गोरे यांच्या हस्ते गौरव ; जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे देशभक्तीमय वातावरणात कार्यक्रम संपन्न

**हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी**

सोयगाव,दि.१७ सप्टेंबर

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भाषण स्पर्धा तसेच 'वाहतूक नियम पाळा' या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत सहभागी होऊन उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र व पेन देऊन गौरव करण्यात आला.





यामध्ये वेदांत शरद पवार याचाही विशेष सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना दिनकर गोरे यांनी शिक्षण,मेहनत आणि सातत्य यांचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण झाला.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल शाळेच्या वतीने सपोनि.दिनकर गोरे यांचे मनःपूर्वक आभार व कौतुक करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर केंद्रप्रमुख फिरोज तडवी, मुख्याध्यापक हरिदास काटोले,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भगवान सोनवणे,किरण पाटील,मंगला बोरसे मॅडम, सविता पाटील,रामचंद्र महाकाळ,गणेश बाविस्कर

अंकुश काळे,प्रतिभा कोळी,सुरेखा चौधरी,कला शिक्षक विवेक महाजन,क्रीडा शिक्षक आणि देसाई,कार्यानुभव शिक्षक तानाजी चव्हाण व पालक वर्ग उपस्थित होता.

## प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात अपर जिल्हाधिकारी शोभादेवी जाधव यांच्या हस्ते ध्वजारोण



**हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी**

**परभणी :** मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या 78 व्या वर्धापन दिनानिमित्त प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयोजित ध्वजारोहण समारंभात अपर जिल्हाधिकारी शोभादेवी जाधव यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख प्रताप चौधरी, सह जिल्हा निबंधक -१ रतनसिंह साळोक, उपअधीक्षक भूमी अभिलेख सुनील मोरे, सह दुय्यम निबंधक बी. एस. घुगे यांच्यासह प्रशासकीय इमारत परिसरातील सर्व कार्यालय प्रमुख, अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## जिंतूरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 76 दिव्यांचे प्रज्वलन





**जिंतूर, प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त जिंतूर शहर मंडळाच्या वतीने श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरात ७६ दिव्यांचे प्रज्वलन करून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी देशाच्या प्रगतीसाठी तसेच सर्वसामान्यांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमात मंडळाचे अध्यक्ष विलास भंडारे, परभणी जिल्हा संघटक डॉ. पंडित दराडे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. देवराव कऱ्हाळे, पत्रकार सचिन रायपत्रीवार, शिवाजी धोत्रे, विजय जाधव, एकनाथ देशमुख, कृष्णा कंठाळे, दत्तराव तळेकर, साबू काका, सिद्धेश्वर घोडके आदी उपस्थित होते.

उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या वाढदिवसानिमित्त दीपप्रज्वलनाचा उपक्रम राबविला. कार्यक्रमास कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती होती.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त समाज कल्याण विभागा कार्यालयात ध्वजारोहण



**हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी**

**परभणी:** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक रामेश्वर मुंडे यांच्या हस्ते समाज कल्याण कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजू एडके यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, परभणी कार्यालय तसेच कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय वसतिगृहे आणि चार शासकीय निवासी शाळांमध्ये 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी कल्याण, स्वच्छता, आरोग्य तपासणी तसेच विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आले. 'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून, स्वच्छता, आरोग्य आणि जनजागृतीवर विशेष भर देण्यात आला आहे. शासनाच्या सेवा-सुविधा अधिक परिणामकारकपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे सहाय्यक आयुक्त राजू एडके यांनी सांगितले. ध्वजारोहणासह 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' आयोजित विविध उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक आयुक्त कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच अधिनस्त शासकीय वसतिगृह व निवासी शाळांमधील संबंधितांनी परिश्रम घेतले.

## हुतात्मा स्मारकास पुष्प अर्पण करून अभिवादन



**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**जालना :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त टाऊन हॉल येथील हुतात्मा स्मारकास पुष्प अर्पण करून हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. मराठवाड्याच्या मुक्तीसाठी हुतात्म्यांनी दिलेल्या अतुलनीय बलिदानाचे स्मरण करून त्यांना कृतज्ञतापूर्वक आदरांजली वाहण्यात आली. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर जिजा भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, सरचिटणीस सुनील पवार, अजित मानधनी, जगदीश नागरे, मनोज इंगळे आदी उपस्थित होते.

## दक्षम कॅपिटलने सौरभ मुंढड़ा नियुक्ती केली

पुणे : दक्षम कॅपिटल, व्यवसाय आणि उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार गुंतवणूक आणि भांडवली उपाययोजना पुरवणारी एक वित्तीय सेवा फर्म, हिने सौरभ मुंढड़ा यांची १ ऑगस्ट, २०२६ पासून सहसंस्थापक आणि पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. कॉर्पोरेट बँकिंग, भांडवली बाजार, धोरणात्मक वित्त आणि सल्लागार क्षेत्रात दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले सौरभ, पश्चिम विभागात दक्षमचा सल्लागार व्यवसाय उभारण्याच्या आणि वाढवण्याच्या प्रयत्नांचे नेतृत्व करतील.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## 'मिशन महाग्राम'ला जिल्हा परिषदेचे नवे बळ; शिक्षण, आरोग्य, कृषी, गृहनिर्माण व उपजीविकेच्या आराखड्यांना गती; 50 हून अधिक गावांत जलसुरक्षेची पावले

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण भागातील ग्रामपंचायती स्वयंपूर्ण करण्यासह शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान टप्पा-२' अर्थात 'मिशन महाग्राम'ला जिल्हा परिषदेच्या पातळीवर नव्याने गती देण्यात आली आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा नियोजन समिती सभागृहात जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. अभियानातील विविध कामांचा आढावा घेत संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवून कामांना गती देण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी दिल्या.



जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके आणि मिशन महाग्रामचे नोडल अधिकारी राघवेंद्र घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. सुरुवातीला घोरपडे यांनी अभियानाचे स्वरूप, आतापर्यंत झालेली कामे आणि आगामी उद्दिष्टांची माहिती दिली.

मिशन महाग्रामअंतर्गत शिक्षण, कृषी, सार्वजनिक आरोग्य, ग्रामीण गृहनिर्माण आणि उपजीविका या प्रमुख क्षेत्रांसाठी तयार करण्यात आलेल्या सामाजिक दायित्व निधीच्या (CSR) आराखड्यांची बैठकीत सखोल तपासणी करण्यात आली. IDBI बँक आणि GIC यांच्या आर्थिक सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांच्या आराखड्यांना अंतिम मान्यतेच्या दृष्टीने पुढील कार्यवाही निश्चित करण्यात आली.

दरम्यान, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (MVSTF) आणि स्टारलाईट टेक्नॉलॉजी लिमिटेड (STL) यांच्या CSR सहकार्यातून जिल्ह्यात पर्यावरण संवर्धन व जलसंधारणाच्या क्षेत्रात झालेल्या कामाचे सादरीकरण करण्यात आले. या माध्यमातून ४.५ लाख वृक्षारोपण, १६० हून अधिक जलसंधारण संरचनांची उभारणी आणि २६.९ लाख घनलिटर पाण्याची बचत झाल्याची माहिती देण्यात आली. या कामाचा ५० हून अधिक गावांना आणि दीड लाखांपेक्षा अधिक नागरिकांना लाभ झाल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

गंगापूर, खुलताबाद आणि कन्नड तालुक्यांतील २२ ग्रामपंचायतींच्या २०२४-२५ व २०२५-२६ मधील उद्दिष्टपूर्तीचा तसेच २०२६-२७ मधील नव्या शासकीय योजनांच्या कृतीसंगम आराखड्यांचा आढावा घेण्यात आला. विविध विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून योजनांचा लाभ ग्रामपातळीपर्यंत पोहोचविण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

MVSTFचे जिल्हा कार्यक्रम समन्वयक किरण बिलोरे यांनी फाउंडेशनच्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले. बैठकीस जिल्हा परिषदेचे सभापती, सदस्य, विभागप्रमुख, संबंधित तालुक्यांचे गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच MVSTFचे तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रामसभेच्या अधिकारासाठी वाघोळ्यात आमरण उपोषण

### 'ग्रामसभा वाचवा' महाराष्ट्रव्यापी आंदोलनाची सुरुवात

हिंदू प्रकाशवार्ता : पतिनिधी

**फुलंब्री :** ग्रामसभा ही गावाच्या विकासातील लोकशाहीचे महत्त्वाचे व्यासपीठ असून, तिचे अधिकार अबाधित ठेवावेत, ग्रामसभा नियमितपणे घेण्यात यावी तसेच ग्रामस्थांना विकासकामे, निधीचा वापर आणि योजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न विचारण्याचा व माहिती मागण्याचा अधिकार कायम ठेवावा, या मागणीसाठी 'ग्रामसभा वाचवा–महाराष्ट्रव्यापी आंदोलन' सुरू करण्यात आले आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर रोजी वाघोळा (ता. फुलंब्री) येथे विकास शेषराव पाटील गायकवाड, श्रीमत साहेबराव पाटील गायकवाड आणि ग्रामस्थांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली.



श्री गणराय, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. ग्रामसभेचा अधिकार कोणत्याही कारणाने बाधित होऊ नये, यासह एकूण १५ प्रमुख मागण्या शासनासमोर मांडण्यात आल्या आहेत.

ग्रामसेवक संघटनेच्या आंदोलनामुळे ग्रामसभा घेण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होण्याची परिस्थिती निर्माण झाली असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. गावातील विकासकामे, निधीचा वापर, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि सार्वजनिक प्रश्नांबाबत ग्रामस्थ ग्रामसभेत प्रश्न उपस्थित करतात. प्रश्न विचारले जात असल्याने ग्रामसभा थांबविण्याऐवजी ती अधिक सक्षम, पारदर्शक आणि आधुनिक पद्धतीने घेण्याची आवश्यकता असल्याची भूमिका आंदोलकांनी मांडली.

ग्रामसभेतील कामकाज अधिक शिस्तबद्ध करण्यासाठी ग्रामस्थांनी विचारावयाचे प्रश्न काही दिवस आधी लेखी स्वरूपात सादर करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित विभागांना प्रश्नांची पूर्वकल्पना मिळून आवश्यक कागदपत्रे व माहिती तयार करता येईल आणि ग्रामसभेत प्रश्नांना व्यवस्थित उत्तरे देता येतील, असे आंदोलकांचे म्हणणे आहे. ग्रामसभा रद्द होऊ नये, ग्रामसभेतील प्रश्नांना योग्य उत्तरे मिळावीत, ग्रामसभेच्या ठरावांवरील कार्यवाहीची माहिती ऑनलाइन तसेच ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करून द्यावी, ग्रामपंचायतींचे सामाजिक लेखापरीक्षण करावे, ग्रामसेवकांच्या कामकाजासाठी स्वतंत्र व वेळबद्ध नागरिक तक्रार व्यवस्था निर्माण करावी, कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी व उपस्थितीनुसार वेतनाची अंमलबजावणी करावी, अशा विविध मागण्या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आल्या आहेत.

याशिवाय वाघोळा-पोफळा ग्रुप ग्रामपंचायतीतील विकासकामे आणि निधीच्या वापराबाबत निष्पक्ष उच्चस्तरीय चौकशी करावी, तसेच निधी, खर्च आणि विकासकामांची संपूर्ण माहिती ग्रामसभेत ग्रामस्थांसमोर पारदर्शकपणे मांडावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या मागण्यांसंदर्भात यापूर्वी शासनातील संबंधित कार्यालयांना निवेदने देण्यात आली असून, त्यांची प्राप्ती व स्वीकृतीच्या प्रती उपलब्ध असल्याचे आंदोलकांनी सांगितले. मात्र ग्रामसभेच्या मूलभूत अधिकाराबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आमरण उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## शासकीय वसतिगृहाऐवजी थेट स्वाधार योजनेचा अर्ज भरण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृहाऐवजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत थेट अर्ज भरण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासकीय वसतिगृह उपलब्ध नसलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांना थेट भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा अर्ज भरता येतो. परभणी जिल्ह्यातील पालम, सोनपेठ, पाथरी व जिंतूर या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृह उपलब्ध नाही. तसेच गंगाखेड तालुक्यात केवळ मुलींसाठी शासकीय वसतिगृह उपलब्ध आहे. त्यामुळे या तालुक्यांतील विद्यार्थ्यांनी, तर गंगाखेड तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये मुलांनी, शासकीय वसतिगृहाऐवजी थेट स्वाधार योजनेचा अर्ज भरणे आवश्यक आहे. काही विद्यार्थ्यांनी नजरचुकीने अन्य तालुक्यातील शासकीय वसतिगृहासाठी प्रवेश अर्ज सादर केले आहेत. संबंधित तालुक्यात शासकीय वसतिगृह अस्तित्वात नसल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना त्या वसतिगृहात तांत्रिकदृष्ट्या प्रवेश देणे शक्य होणार नाही.त्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी ज्या शासकीय वसतिगृहाचा प्रवेश अर्ज भरला आहे, त्या वसतिगृहाच्या गृहपालांशी दि. २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत संपर्क साधावा. तसेच आपला वसतिगृह प्रवेश अर्ज रद्द करण्यासाठी लेखी अर्ज सादर करावा. यासोबत ऑनलाइन भरलेल्या अर्जाची प्रत, आधारकार्डची प्रत आणि शैक्षणिक संस्थेचे मूळ बोनाफाईड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.अर्ज रद्द झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत स्वाधार योजनेचा अर्ज भरता येणार आहे. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत आवश्यक कार्यवाही करून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य आणि लोकशाही मुल्यांची जपवणूक करत परभणी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाला गती देण्यासाठी शासन कटीबध्द आहे, असे प्रतिपादन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमप्रसंगी केले.



यावेळी महापौर सय्यद इक्बाल, जिल्हा परिषद अध्यक्षा लता वाकळे, खासदार संजय जाधव, उपमहापौर गणेश देशमुख, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, अपर जिल्हाधिकारी शोभादेवी जाधव, अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, स्वातंत्र्य सैनिक यांच्यासह वीरपत्नी, वीर माता-पिता, विद्यार्थी, पत्रकार व नागरिक उपस्थित होते. जिल्हयात पर्जन्यमानात घट झाली असली, तरी शेतकऱ्यांनी संभाव्य टंचाईच्या परिस्थितीला घाबरु नये.

## जिल्हा परिषदेत मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात; अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्रांगणात जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, बांधकाम सभापती सचिन गरड, समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के, मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके उपस्थित होते.



ध्वजारोहणानंतर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष आणि स्वच्छ भारत मिशनअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'स्वच्छता ही सेवा' अभियानाचा शुभारंभ अध्यक्ष अविनाश गलांडे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यात हे अभियान राबविण्यात येणार आहे. या काळात ग्राम व तालुका पातळीवर पाणी आणि स्वच्छतेशी संबंधित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते अभियानाच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

अध्यक्ष अविनाश गलांडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांनी उपस्थितांना मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. यानंतर दिव्यांग-दिव्यांग तसेच दिव्यांग-अवयव व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देणाऱ्या योजनेतील लाभार्थी जोडप्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच योगासने व प्राणायाम या विषयात डॉक्टरेट मिळविल्याबद्दल सेवानिवृत्त ग्रामपंचायत अधिकारी डॉ. भीमराव गाडे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विवेक साळवे यांनी गॅस सुरक्षा विषयावर प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद जटाळे, जिल्हा कृषी अधिकारी प्रकाश पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक साहेबराव चव्हाण, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा बाळासाहेब शेळके, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाटकर, कार्यकारी अभियंता बांधकाम किरण धनके, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संघरत्न सरोदे, पशुसंवर्धन उपआयुक्त नानासाहेब कदम, समाज कल्याण अधिकारी बाबासाहेब आरावत यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन कृष्णा शिंदे यांनी केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रम सरगर, जिल्हा व्यवस्थापक (विपणन) सचिन सोनवणे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जि प शाळेला लोकसहभागातून दोन एलईडी टिव्ही भेट; मंथन परीक्षेतील गुणवंतांचा गौरव

**अजिंठा प्रतिनिधी :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त वांगी गावातील ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामसेवक एल आर कोळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तसेच जि प शाळेत शालेय अध्यक्ष दिलीप काकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. आजचे युग हे डिजिटल तंत्रज्ञानाचे आहे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक पद्धतीने शिक्षण मिळावे, या उद्देशाने शालेय व्यवस्थापन समितीचे नवनिर्वाचित अध्यक्ष,उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांनी स्वखर्चातून



शाळेला दोन एलईडी टीव्ही भेट दिले असून डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांना दृकश्राव्य माध्यमातून अधिक प्रभावीपणे शिकता येणार आहे या कौतुकास्पद दातृत्वाबद्दल ग्रामस्थांनी व शिक्षकांनी शालेय व्यवस्थापन समितीचे आभार मानले. मंथन राज्यस्तरीय परीक्षेत जिल्हा परिषद शाळेतील ३१ विद्यार्थी सहभागी झाले होते,घवघवीत यश संपादन करणाऱ्या मंथन परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा शालेय व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच शाळेने हे यश मिळवल्याचे यावेळी सांगण्यात आले.या कार्यक्रमाला गावातील सरपंच, उपसरपंच, सदस्य,ग्रामस्थ, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या शहिदांना भूमिपुत्र जन पार्टीतर्फे अभिवादन; शासकीय अनास्थेबद्दल व्यक्त केला खेद

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्ती संग्रामाचा सुवर्णइतिहास आणि स्वातंत्र्यलढ्यात प्राणांची आहुती देणारे शूर वीर हुतात्मे यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी संपूर्ण परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्ती संग्रामामध्ये देशासाठी व मातृभूमीसाठी शहीद झालेल्या स्वातंत्र्यसैनिकांना मराठवाडा भूमिपुत्र जन पार्टीच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. पक्षाचे संस्थापक अध्यक्ष



मधुकरराव भोळे यांनी हुतात्मा स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना अभिवादन केले. याप्रसंगी स्वातंत्र्यलढ्यातील शहिदांच्या बलिदानाचे स्मरण करत उपस्थितांनी काही वेळ स्तब्धता पाळून आदरांजली अर्पण केली.

या महत्त्वपूर्ण प्रसंगी भूमिपुत्र जन पार्टीचे अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये पक्षाचे ज्येष्ठ एडवोकेट नरहरी कांबळे, बी. अँड. ढाले, किरण कुमार भोळे, साहेबराव नलावडे, अशोक हिवाळे आणि एन. सी. खरात यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती पाहायला मिळाली.

## मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी बांधवांसोबत स्नेहभोजन



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण -रायगड :** देशाचे प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उरण मानव सेवा संघाच्या वतीने आदिवासी बांधवांसाठी स्नेहभोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी रा. जि. प. शाळा, डाऊरनगर, उरण येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी परिसरातील मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी जपत आदिवासी बांधवांसोबत स्नेहभोजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

उरण मानव सेवा संघ ही संस्था उरण परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, शिक्षण, आरोग्य तसेच गरजू नागरिकांना मदत करण्याचे कार्य करत आहे. समाजात वावरताना गरजू बांधवांना आवश्यक ती मदत मिळावी, या उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

उरण परिसरातील नागरिकांच्या विविध सामाजिक गरजा लक्षात घेऊन भविष्यातही संस्थेच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## सिल्लोड तालुक्यातील सासुरवाडा येथील पीरवाडी परिसरात पीरबाबा यात्रेनिमित्त जंगी कुस्त्या

### स्पर्धेला आमदार अब्दुल सत्तार यांनी सदिच्छा भेट देत पैलवान आणि कुस्तीप्रेमींशी संवाद साधला

**अजिंठा प्रतिनिधी :** ग्रामीण भागात आजही कुस्तीची परंपरा मोठ्या उत्साहाने जपली जात असून, स्थानिक पैलवानांना व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळावे, यासाठी अशा आखाड्यांचे आयोजन महत्त्वाचे ठरते. यावेळी मित्र मंडळाच्या वतीने आयोजकांकडे ११ हजार रुपयांचे बक्षीस सुपूर्द करण्यात आले.

आखाड्यातील पैलवानांच्या उत्साहाला दाद देत आमदार अब्दुल सत्तार यांनी कुस्तीप्रेमींशी संवाद साधला. महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली कुस्तीची परंपरा पुढे



नेण्यासाठी ग्रामीण स्तरावरील अशा उपक्रमांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन पा. गाढे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नानासाहेब रहाटे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक सयाजीराव वाघ, माजी नगरसेवक अशोक सूर्यवंशी, कल्याणराव डवणे, विष्णू काळे, गणेश भोटकर, कृष्णा भोटकर, गोविंद काळे, राजाराम भोटकर, विष्णू सपकाळ, मनोज भोटकर, विजय भोटकर यांच्यासह ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

पीरबाबा यात्रेनिमित्त आयोजित या कुस्ती आखाड्यामुळे परिसरातील पैलवान आणि कुस्तीप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911